# जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय, ठाणे
## (महसूल शाखा)

पत्रव्यवहाराचा पत्ता :- महसूल शाखा,
जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे,
पहिला माळा, कोर्टनाका, ठाणे (प.)

दुरध्वनी क्र. ०२२-२५३४३६३६
फॅक्स क्र. ०२२-२५३४९२००

---

क्र/महसुल/क-१/टे-४-६/सीआरझेड प्रारुप मसुदा/हरकती व सुचना/२०१८ दिनांक - २५/०१/२०१८

प्रति,

१) मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका,
२) मा. आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका,
३) मा. आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका,
४) मा. आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका,
५) मा. आयुक्त, भिवंडी-निजामपुर महानगरपालिका,
६) मुख्याधिकारी, कुळगाव बदलापुर नगरपरिषद,
७) मुख्याधिकारी, अंबरनाथ नगरपारिषद,
८) नियोजक, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
९) सहायक संचालक, नगररचना ठाणे,

**विषय** :- ठाणे जिल्हयाचे प्रारुप किनारा क्षेत्र व्यवस्थापन आराखडे (CZMP) प्रसिद्ध झाले असल्याने त्यावर प्राप्त हरकतीवर जन सुनावणी घेणेबाबत....

**संदर्भ** :- संचालक, पर्यावरण तथा सदस्य सचिव, महाराष्ट्र सागरी किनारा व्यवस्थापन प्राधिकरण यांचेकडील पत्र क्र.एमसीझेडएमए २०१६/प्र.क्र.२२/तां.क.४, दिनांक ३०/११/२०१७.

उपरोक्त विषयाबाबत संदर्भिय नमुद पत्रान्वये महाराष्ट्र सागरी किनारा व्यवस्थापन प्राधिकरण पर्यावरण विभाग यांचेमार्फत सीआरझेड अधिसुचना २०११ अंतर्गत एकत्रित ठाणे व पालघर जिल्हयाचे प्रारुप किनारा क्षेत्र व्यवस्थापन आराखडे (CZMP) बनविण्याचे काम सेस (NCESS) केरळ यांचेमार्फत पुर्ण झाले असून सदर आराखडे प्रसिद्ध करणे त्यावर सुचना व हरकती मागविणे आवश्यक असल्याने ठाणे जिल्हयाचे प्रारुप किनारा क्षेत्र व्यवस्थापन आराखडे (CZMP) दिनांक ३०/११/२०१७ रोजी पर्यावरण विभागाच्या http://mahenvis.nic.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध केले असून या कार्यालयाच्या http://thane.nic.in संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेबाबत या कार्यालयास निर्देशीत केले आहे. त्याअनुषंगाने सदरचे आराखडे या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आले आहे.

सदर ठाणे जिल्हयाचे प्रारुप किनारा क्षेत्र व्यवस्थापन आराखडे संदर्भात या कार्यालयात हरकती अर्ज प्राप्त झालेले आहेत तसेच आपणाकडे हरकती प्राप्त झालेले असल्यास सदर हरकतीच्या अनुषंगाने सोमवार, दिनांक २९/०१/२०१८ रोजी सकाळी ११:०० वाजता नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे आवार या ठिकाणी जनसुनावणीचे आयोजन करण्यात आलेले आहे. तरी सदर सुनावणीस आपण आवश्यक त्या लेखी अभिप्राय व पुराव्यासह (दोन प्रतीत) उपस्थित रहाणेस विनंती आहे.

**निवासी उपजिल्हाधिकारी**
**जिल्हाधिकारी ठाणे करीता**